# इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती पुणे

## प्रसिध्दी निवेदन

ए.टी.के.टी. च्या विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. ११ वी केंद्रीय समिती मार्फत दिनांक २७/७/२०१३ व २९/७/२०१३ रोजी झाल्यानंतर प्रवेश समितीचे कामकाज वेळापत्रानुसार पूर्ण होत आहे. तद्नंतर **रिक्त राहीलेल्या जागेवर कॉलेज च्या स्तरावर प्रवेश होतील.**

बाहेरुन बदली होवून आलेल्या शासकीय निमशासकीय पालकांनी / विद्यार्थ्यांनी **प्रवेशासाठी परस्पर कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधावा.** कॉलेज स्तरावरील रिक्त जागेवरील प्रवेशासंदर्भातील वेळापत्रक पुढील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | दिनांक ३० व ३१ जुलै २०१३ आणि १ ऑगस्ट २०१३ | स. १०.३० ते ५.०० | कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेश अर्ज स्वीकारणे. |
| २ | दिनांक २ व ३ ऑगस्ट २०१३ | स. १०.३० ते ५.०० | प्राप्त प्रवेश अर्जानुसार गुणवत्ता यादी तयार करणे. |
| ३ | दिनांक ५ ऑगस्ट २०१३ | सकाळी १०.०० | गुणवत्ता यादी जाहीर करणे |
| ४ | दिनांक ५, ६ व ७ ऑगस्ट २०१३ | स. १०.३० ते ५.०० | गुणवत्तायादीनुसार रिक्त राहीलेल्या जागांवर प्रवेश देणे. |

ही केंद्रीय प्रवेश पध्दती कार्यान्वित करण्यात ज्यांची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या मदत झालेली आहे त्या सर्वांचे इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समितीकडून मन:पूर्वक आभार.

सुमन शिंदे
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे